प्रबोधनाशिवाय ज्यांना मानाने जगता येणार नाही अशा वर्गातून येईल. त्यांचे आदर्श म्हणून राममोहन रॉय, लोकहितवादी, नर्मद, इत्यादी नसतील. कारण त्यांचा वारसा सांगणारे लोक भद्रसमाजातील असून प्रस्थापित हितांचे प्रवक्ते बनले आहेत. म्हणून या नवीन नेतृत्वाचे आदर्श असतील जोतीराव फुले, महात्मा गांधी आणि मानवेन्द्रनाथ रॉय. रॉय यांचे जीवनदर्शन व चिकित्सक वृत्ती, गांधी यांची सर्वस्पर्शी करुणा व सत्यनिष्ठा, आणि फुले यांची पोटतिडीक व जात किंवा धर्म याची पर्वा न करता सर्व जातींच्या नवब्राह्मणांना झोडपून काढणारी शेतकऱ्याच्या आसुडासारखी भाषा या सर्व गोष्टींची त्याला गरज भासणार आहे.

महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तर असे नेतृत्व उदयास येण्याची चिन्हे आता दिसू लागली आहेत. येथे मला, जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाच्या नावाने एक पर्यायी राजकीय व्यासपीठ उभे करू पाहणारी मंडळी अभिप्रेत नाही. त्यांच्या दृष्टीने प्रबोधनकार्य म्हणजे सत्तेच्या राजकारणाचेच एक अंग किंवा सक्तीचे स्मशानवैराग्य होय. अशा लोकांच्या हातून ब्राह्मणद्वेष वाढविण्यापलीकडे काही होणार नाही. राजकारणात असले तरी ज्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा नाही, आणि गरज भासली तर पक्षीय राजकारणातून बाहेर पडण्याचीही ज्यांची तयारी आहे अशीच माणसे या नवीन प्रबोधनाचे नेतृत्व करू शकतील. श्री. हमीद दलवाई आणि डॉ. बाबा आढाव यांचा महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात उदय होणे ही या दृष्टीने एक फार सूचक घटना होय. अशी माणसे जेव्हा माळी, धनगर आणि अनुसूचित जातींमधून पुढे येतील तेव्हा महाराष्ट्रातील विसाव्या शतकातील प्रबोधनास खरी चालना मिळेल.

□ □

पारंपरिक राष्ट्रवादापासून मुक्तता

वसंत पळशीकर

१

पृथ्वीच्या पृष्ठभागाची वाटणी आज राष्ट्रांमध्ये झालेली आहे; अद्यापही काही भू-भाग स्वतंत्र नाहीत, पण त्यांचे आकारमान नगण्य आहे; आणि त्यांपैकी बऱ्याच भू-भागांना स्वतंत्र होण्याची मोठी आकांक्षाही नाही. कारण मोठ्या राष्ट्राच्या आश्रयाने राहण्यातच त्यांचा स्वार्थ आहे. अनेक राष्ट्रे मिळून जग बनलेले असणे हीच स्वाभाविक व योग्य व्यवस्था आहे अशी आज सार्वत्रिक धारणा आहे.

वास्तविक 'राष्ट्र' या घटनेचा उदय तसा अलीकडचा आहे; आणि युरोप ही राष्ट्र या घटनेच्या उदयाची तसेच राष्ट्र या संकल्पनेच्या बांधणीचीही मूलभूमी आहे. मध्ययुगाच्या अस्तानंतर अनियंत्रित राजसत्ता आकारास आल्या व या राजसत्तांच्या भोवती राष्ट्रांची कालांतराने बांधणी झाली. इंग्लंड हे एक बेट असल्याने आपल्या पृथक अस्तित्वाची जाणीव इंग्लंडच्या इतिहासात पुष्कळ आधीपासून आढळते. तरी आजच्या

अर्थाने ते राष्ट्र बनले ते पुष्कळ नंतर. सामान्यतः फ्रेंच राज्यक्रांतीच्यापासून पुढच्या काळात राष्ट्र, राष्ट्रीय सत्ता, राष्ट्रवाद या संकल्पनांचा प्रसार झाला, व या संकल्पनांच्या अनुरोधाने वेगवेगळ्या सत्ता आपली प्रतिमा घडवू लागल्या असे म्हणता येते. संकल्पनांचा हा समुच्चय अशा रीतीने सुमारे पावणेदोनशे वर्षांतला आहे; इतका तो नवीन आहे.

असे असूनही आज बहुधा आपण सगळेच असे मानतो की, ही एक अनादि-कालापासून चालत आलेली रचना व व्यवस्था आहे; आणि ती यापुढच्या काळातही चालू राहणार आहे, नव्हे ती चालू राहिलीच पाहिजे. म्हणजे, जग हे वेगवेगळ्या सार्वभौम राष्ट्रीय सत्तांचे मिळूनच बनलेले असले पाहिजे. या बाबतीत आपण फार तर थोडी सवलत द्यायला तयार असतो. दोन सार्वभौम राष्ट्रे एकत्र येऊन संयुक्त राष्ट्र स्थापन करू म्हणाले तर आपण ते गैर झाले असे मानीत नाही; पण उद्या जग हे राष्ट्रीय सत्तांचे मिळून बनलेले नसावे, काही वेगळीच रचना व व्यवस्था भविष्यात आवश्यक आहे, असे म्हटले तर ते मान्य होणार नाही.

प्रत्यक्ष परिस्थितीच्या दडपणाने युरोपातली राष्ट्रे आपल्या सार्वभौमत्वास मुरड घालून एक नवी रचना उभी करण्याच्या उद्योगात आहेत. पण तेथेही आज तरी प्रत्येक राष्ट्रीय सत्ता आपल्या राष्ट्राचा स्वार्थ अधिकात अधिक कसा साधेल हे मनात ठेवून वागताना दिसत आहे.

भविष्यात डोकावून पाहणाऱ्यास राष्ट्रीय सत्तांचे सार्वभौमत्व ही एक जगाच्या कल्याणाच्या दृष्टीने मोठी अडचण ठरणार आहे, ही वस्तुस्थिती दिसते. उदाहरणार्थ, गरीब व सधन हा जगात आढळणारा भेद घ्या. या क्षेत्रातील कमालीची (व तीही नित्य वाढती) विषमता सुसह्य ठरेल इतकी कमी करावयाची म्हटले तरी सधनांनी आपल्या धनात इतरांना वाटेकरी करून घेण्यासाठी आपली मने मोठी केली पाहिजेत. पण आजच्या राष्ट्रीय सत्तांच्या व्यवस्थेत दानशूरत्वाच्या मर्यादेतच सधन मदत करतील हे उघड आहे. कुटुंबातल्या माणसाला आपण जसा वाटेकरी करून घेतो तशा पद्धतीने वाटेकरी करून घेण्यासाठी दानशूरत्व पुरेसे नाही. दानशूरपणातही सधन राष्ट्रे उणी पडत आहेत, ही गोष्ट राष्ट्रवादी मानस हा केवढा मोठा अडथळा आहे याची साक्ष आहे.

पण असा मुद्दा उपस्थित केला की आपल्याकडे एक ठराविक उत्तर दिले जाते. उदाहरणार्थ, केवळ वस्तु-वैपुल्याच्या स्वरूपाची संपन्नता खरे समाधान देत नाही हा पाश्चिमात्त्य देशांचा अनुभव लक्षात घेऊन आपण आपल्या औद्योगीकरणाचा व अर्थ-व्यवस्थेचा घाट काही वेगळा ठेवला पाहिजे असे म्हटले, तर येथे प्रथम वस्तुवैपुल्याच्या स्वरूपाची सुबत्ता तर भरपूर येऊ द्या, आम्हाला आज त्याचीच गरज आहे, असे उत्तर दिले जाते. तात्पर्य म्हणजे, पुढारलेल्या पाश्चात्त्यांचे आणि आम्हा मागासलेल्यांचे प्रश्न वेगळे आहेत, असे सांगितले जाते. राष्ट्रवादी भूमिकेविषयीही असेच म्हटले जाईल; भारताला आज 'जय जगत्' वा 'वसुधैव कुटुंबकम्' या भूमिकेची अजिबात जरुरी

नसून, कडव्या राष्ट्रवादाची गरज आहे असे म्हटले जाईल. या बाबतीत, काही अपवादभूत गट सोडले तर, सर्व प्रकारच्या राजकीय व सामाजिक विचारप्रणालीच्या लोकांचे एकमत होईल असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. भाषिक पुनर्रचना आणि १९६२ सालचे चिनी आक्रमण या दोन प्रसंगी जी मते प्रकट झाली त्यावरून या बाबतीत डावे व उजवे यांच्यात फार जवळीक असल्याचे आढळून आले होते.

भारताचे दुबळेपण हे भारत अद्यापि पुरेसा राष्ट्रवादी नसण्यातून उद्भवलेले आहे, आणि जाज्वल्य व कडवी राष्ट्रनिष्ठा लोकांच्या ठिकाणी निर्माण केल्यानेच भारत हे एक समर्थ राष्ट्र बनेल, हे विश्लेषण हिंदुत्ववादी विचारसरणीचे म्हणून ओळखले जाणारे लोक अत्यंत तळमळीने मांडीत असतात. पण सामान्यतः हे विश्लेषण इतर बहुतेकांनाही मान्य होईल असेच आहे.

भारत हे एक समर्थ राष्ट्र व्हावे हे उद्दिष्ट कोणत्या हेतूने बाळगावयाचे? हा प्रश्न तूर्त आपण उपस्थित करीत नसलो तरी त्याची दखल घ्यायला हवी इतके आपण म्हणून ठेवू. 'समर्थ' या शब्दात आपण कोणता आशय भरतो व पाहतो हाही असाच एक प्रश्न आपण तूर्त बाजूला ठेवू. आणि असे गृहीत धरू की, भारतास समर्थ बनविणे हे आपले सर्वमान्य उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साधण्याचे कडवी, जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा अंगी बाणवणे, हे साधन आहे काय?

होय. पण एक गोम आहे. ती अशी की, 'राष्ट्र' आणि 'राष्ट्रनिष्ठा' यांचे तुम्ही अर्थ कसे करता त्यावर हा होकार सर्वस्वी अवलंबून आहे. हा अर्थाचा मुद्दा उपस्थित केला की, अनेक प्रश्न उपस्थित होतात, त्यांचा विचार आता आपणास करावयाचा आहे.

२

राष्ट्र कशाला म्हणावयाचे, आणि त्या अर्थाने भारत हे एक राष्ट्र आहे काय असे दोन प्रश्न प्रथमच उपस्थित होतात. हिंदुस्थान हे एक राष्ट्र नाही, हे प्रतिपादन बरेच जुने आहे. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात अनेकांकडून तसे प्रतिपादन केले गेले. अनेक राष्ट्रिक लोकसमूह हिंदुस्थान नावाच्या देशात एकत्र आलेले आहेत, आणि म्हणून एकजिनसी राष्ट्रातल्याप्रमाणे येथे जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणे गैर आहे, असे सर्वच प्रमुख जमातींचे पुढारी म्हणत. इंग्रज तर असे म्हणतच. किंबहुना अशा या अठरापगड राष्ट्रिक लोकसमूहांच्या मिळून बनलेल्या देशात इंग्रजांसारखी एक परकी सत्ताच निःपक्षपाती राजवट देऊ शकते व तेच ब्रिटिश सत्तेचे येथील थोर कार्य होय, अशीही भूमिका प्रामाणिकपणे घेतली गेलेली आढळते. तेव्हा वरील दोन्ही प्रश्न दिसायला सोपे असले तरी अवघड आहेत.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळून जो भारत देश अस्तित्वात आला त्यास राष्ट्र म्हणता येईल का? त्यास जर राष्ट्र म्हटले तर मग स्वातंत्र्यापूर्वीचा हिंदुस्थान हे एक

राष्ट्र नव्हते का? राष्ट्र हे सरहद्दींवरून ठरते असे मानण्यातला घोटाळा असा की, इतिहासात सरहद्दी सतत बदलत आलेल्या आहेत असे दिसते. ब्रिटिशांच्या काळात हिंदुस्थानच्या ज्या चतुःसीमा होत्या त्याही ब्रिटिश अमदानीच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत एकच नव्हत्या. एडन, ब्रह्मदेश यांचा समावेश किती तरी वर्षे हिंदुस्थानात होत होता. हिंदुस्थानपासून ते प्रदेश वेगळे झाले म्हणजे हिंदुस्थान या राष्ट्राचे लचके तोडले गेले असे कोणी मानत नाही. म्हणजे सरहद्दींवरून राष्ट्र ठरत नाही. म्हणजे १९४७ नंतरच्या भारतास राष्ट्र म्हणावयाचे तर दुसरे काही तरी कारण दिले पाहिजे.

एकजिनसी संस्कृती ही कसोटी आपण ठरविली तरी घोटाळाच होतो. पाश्चिमात्त्य संस्कृती– किमानपक्षी पश्चिम युरोपीय संस्कृती– ही एकजिनसी आहे; पण 'राष्ट्रे' अनेक मानली गेली आहेत. दक्षिण अमेरिका खंडातही असाच प्रकार दिसतो. म्हणजे, एक तर असे म्हटले पाहिजे की, सर्व पश्चिम युरोप हे एक राष्ट्र आहे व वेगवेगळ्या राज्यसत्तांमध्ये ते विभागले गेले आहे; किंवा राष्ट्राची ओळख वा निश्चिती संस्कृतीवरून करता येत नाही असे म्हटले पाहिजे. कोणी असे म्हणेल की, पश्चिम युरोपच्या सांस्कृतिक जीवनात काही समान वैशिष्ट्ये आढळत असली तरी फ्रान्स, जर्मनी, इटाली, वगैरे देशांच्या संस्कृती पृथगात्म आहेत, व त्यांच्या पृथगात्मतेमुळेच ही राष्ट्रे वेगळी अस्तित्वात आहेत. ही पृथगात्मता ठरविण्याचे एक महत्त्वाचे गमक भाषा असे म्हणता येईल. राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानामध्ये भाषा या घटकाला फार महत्त्व दिलेले आहे. मग कोणत्याही दृष्टीने पाहिल्यास आजचा भारत हा एक राष्ट्र ठरत नाही. नागा, लद्दाखी इत्यादी लोकसमूहांची संस्कृती इतकी भिन्न आहे की, राष्ट्रवादाच्या भूमिकेप्रमाणे– प्रत्येक राष्ट्राची स्वतंत्र राज्यसत्ता असायला हवी– या लोकांना त्यांच्या प्रदेशांसह बाहेर काढायला हवे. दुसऱ्या बाजूला, पश्चिम युरोपप्रमाणे पृथगात्मतेची कसोटी लावली तर प्रत्येक भाषिक लोकसमूह हे एक राष्ट्र ठरते, व भारत ही एक अनेक राष्ट्रांची बांधलेली आवळ्याभोपळ्यांची मोट ठरून ती मोडणे हे राष्ट्रवादी माणसाचे कर्तव्य ठरते.

या प्रकारच्या पेचांमधून सोडवणूक करण्यासाठी सावरकरांच्या प्रसिद्ध व्याख्येचा आधार घेतला जातो. सावरकर आधी हिंदू कोणास म्हणावे त्याची व्याख्या करतात, ती अशी : " आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदू. " पण 'हिंदू' या शब्दाच्या इतरही प्रकारे व्याख्या करता येतील. ही व्याख्या धरून पुढे काही प्रतिपादन सावरकरांनी केले आहे असे दिसते का? तर, अशा हिंदूंचेच फक्त हिंदुस्थानात राजकीय वर्चस्व असावे, कारण ही त्यांची राष्ट्रीय भूमी आहे, असे त्यांचे म्हणणे आहे असे दिसते. त्यांच्या 'हिंदू' या शब्दाच्या व्याख्येतून अटळपणे हे प्रतिपादन निष्पन्न होऊ शकत नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. कारण 'राष्ट्रा'ची व्याख्या त्यासाठी आधी करावयास हवी होती. पण त्यांच्या म्हणण्याचा आशय पाहता, अमूक एक देश ही ज्या लोकांची पितृभू व पुण्यभू असेल त्या लोकांचा तो देश हे राष्ट्र म्हणावे, अशी काहीशी व्याख्या होईल. आता पुढचा प्रश्न असा की, अमूक एक देश

ज्या लोकांचे राष्ट्र आहे त्यांनाच त्या देशाच्या राज्यसत्तेत सहभागी होण्याचा अधिकार असावा, ही गोष्ट व्याख्येतून निष्पन्न होत नाही. पण हे त्यापुढील गृहीतकृत्य असल्याचे दिसते. पण इतके सगळे जर आपण एकत्र विचारात घेतले तर जगातील बहुतेक राष्ट्रे ही राष्ट्रेच उरत नाहीत. बहुतेक देशांतून त्या देशाचे नागरिकत्व स्वीकारलेल्या सर्वांना समान राजकीय अधिकार दिलेले आहेत. अशी, आपल्या उद्दिष्टांची सोय पाहून जगावेगळी व्याख्या आपण नेहमीच करू शकतो; पण मग त्या व्याख्येस सर्वसाधारण प्रामाण्य काही उरत नाही, व असे प्रामाण्य नसलेली व्याख्या कोणी का मानावी?

पण, त्याहीपेक्षा, सावरकरांची व्याख्या अस्तित्वात असलेल्या घटनेचे स्पष्टीकरण करणारी नाही हे तरी किमान लक्षात यावे. काही तरी नवे निर्माण करण्यासाठी आधार म्हणून उपयोगी पडावी अशासाठी जन्मास घातलेली ही संकल्पना ठरते. कारण 'हिंदू' या शब्दाचीही सावरकरांची व्याख्या त्यांची स्वतःची आहे, ती पूर्वापार चालत आलेली व लोकांमध्ये प्रचलित असलेली अशी नाही. उद्या जर भारतातील ठिकठिकाणच्या व्यक्तींना 'हिंदू कोण?' असा प्रश्न केला तर त्यातले एक टक्का लोकही सावरकरांची व्याख्या काही उत्तरादाखल सांगणार नाहीत. असा हा सावरकरी व्याख्येचा मामला.

आणि त्यांची व्याख्या मानली तरी पेच सुटत नाहीच. मग भारत हे वस्तुतः हिंदूंचे राष्ट्र, पण ते आज तसे नाही, असे ठरते. म्हणजे आजचा भारत देश ही एक राज्यसत्ता ठरते. शिवाय " आसिंधुसिंधु " भूमी–सिंधु (नदी) पासून सिंधु (समुद्र) पर्यंत–आज भारताजवळ नाही तेही विचारात घेतले पाहिजे. स्वातंत्र्य हे मग स्वातंत्र्य ठरत नाही. आणि ब्रिटिशांनी आपल्या एकछत्री अमलाखाली आणलेला हिंदुस्थानही राष्ट्र ठरत नाही. कारण, त्यात अतिरिक्त असा बराच प्रदेश होता. आणि ब्रिटिशांपूर्वीच्या काळात तर साधा एकछत्री अंमलदेखील कधी काळी असलेला आढळत नाही. पण जर सावरकरांच्या थाटात ही व्याख्या प्राचीन कालापासून वास्तवास धरून आहे असे म्हटले तर, राष्ट्र एक असूनही राज्यसत्ता अनेक बदलल्या, व त्यांच्यात जीवघेणा संघर्ष होता हे सर्व स्वाभाविक म्हणून मान्य करावे लागते. तसे केले तर आजच्या भारताचे आणखी पाच पन्नास तुकडे पडण्यास हरकत नाही असे मान्य करणे क्रमप्राप्त ठरते.

३

इतिहासात मागे जाऊन घेतलेला शोध आणि राष्ट्रवादाविषयीची तात्त्विक मांडणी या दोन्ही गोष्टी अशा रीतीने वरील दोन साध्या प्रश्नांचेही समाधानकारक उत्तर देण्यास असमर्थ ठरतात. हा सर्व अव्यापारेषु व्यापार सोडून दिला तरच साधे पण भक्कम सत्य हाती लागते. ते असे की, ब्रिटिशांच्या अमदानीत आम्ही सर्व हिंदी लोक मिळून एक राष्ट्र आहोत ही अस्मिता आमच्या ठिकाणी निर्माण झाली व तीच आमच्या राष्ट्रीयत्वाचा एकमेव आधार आहे. सरहद्दी, भाषा, धर्म, संस्कृती, इतिहास व दैवते इत्यादी गोष्टी समान होत्या किंवा आज आहेत असे म्हणता येण्याची त्यासाठी मुळीच आवश्यकता

नाही. या व इतर अनेक बाबतींत भेद असलेले लोकही एकराष्ट्रीयत्वाची भावना बाळगू शकतात, याचे अमेरिका हे राष्ट्र हे एक चांगले उदाहरण आहे.

ब्रिटिश अंमलाखाली आमच्या ठिकाणी राष्ट्रीय अस्मिता उत्पन्न झाली कारण, राष्ट्र ही संकल्पना व त्यावर आधारलेला राष्ट्रवाद यांची मांडणी युरोपात त्याच काळात जोमाने केली गेली, तिचे पडसाद येथील ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या वर्तनात व बोलण्यात उमटू लागले, आणि त्यास प्रतिसाद म्हणून आम्हीही एक हिंदुस्थान नावाचे राष्ट्र आहोत असे प्रतिपादन करू लागलो. राष्ट्राला आधारभूत म्हणून, राष्ट्र म्हणून स्वतःस म्हणता येण्याची कसोटी म्हणून ज्या अनेक गोष्टी सांगितल्या जात होत्या त्या कसोट्यांना आम्ही पार पडतो, ते सगळे आधार आमच्यापाशीही आहेत, असे आम्ही म्हणू लागलो. हिंदुस्थान हे कधीच राष्ट्र नव्हते व यापुढेही ते राष्ट्र या कसोटीला उतरणार नाही या साहेबाच्या प्रतिपादनास प्रत्युत्तर म्हणून आमचे प्रतिपादन जास्तच आग्रही बनले. राष्ट्र ही मिथिकल संकल्पना आहे, व तिचे मांडले जाणारे तत्त्वज्ञान हे म्हणून बव्हंशी कृत्रिम व कच्चे आहे ही गोष्ट तेव्हा कोणाच्याच लक्षात आली नसल्यास नवल नाही. राष्ट्रवादाच्या उत्कर्षाच्या काळातल्या वातावरणात सगळेच प्रवाहपतित होते.

आपले सर्वांचे मिळून एक राष्ट्र आहे असे वाटणे हे पुरेसे आहे; किंबहुना, ते वाटणे टिकून राहणे, त्या भावनेची पाळेमुळे खोलवर जात जात दृढ होणे हाच राष्ट्राचा एकमेव आधार आहे. हे आम्हाला त्या वेळी उमगले नाही. म्हणून हिंदुस्थानची फाळणी झाली. कारण आम्ही भाषा, संस्कृती, धर्म, इतिहास व दैवते यांसारख्या गोष्टी राष्ट्र-बांधणीस अत्यावश्यक मानल्या; पण या गोष्टींच्या अनुषंगाने उभारलेली प्रत्येक चळवळ अपरिहार्यपणे एकराष्ट्रीयत्वास तडा देऊन जाणारी ठरत गेली. उत्तरेत एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी हिंदी भाषेस प्राधान्य मिळावे यासाठी चळवळ झाली, तिने उत्तरेतील पुढारलेला मुसलमान खानदानी वर्ग बिथरला. गोरक्षणाची चळवळ, आर्यसमाजाची हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करणारी चळवळ, गणेशोत्सव-शिवजयंत्युत्सव,-अनेक उदाहरणे देता येतील. हिंदूंच्या बाजूने जशा या चळवळी तशा मुसलमान जमातीच्या बाजूनेही अशाच प्रकारच्या समांतर चळवळी संघटित केल्या गेल्या. दोन्ही जमाती आपापल्या सभासदांमध्ये तत्कालीन प्रचलित राष्ट्रवादाच्या धारणेनुसार इष्ट व आवश्यक गोष्टी पोशीत होत्या, आणि यात आपण गैर काय करीत आहोत याची दोघांनाही उमज पडत नव्हती. त्यांच्या दृष्टीने युरोपमध्ये अशाच प्रकारच्या जागृतीतून राष्ट्रे निर्माण झालेली होती. येथे या सगळ्याचा परिणाम दोन परस्परविरोधी राष्ट्रीय अस्मिता निर्माण होण्यात झाला, व एकच राष्ट्र म्हणून विकास होणे ही शक्यता असूनही शेवटी दोन राष्ट्रे निर्माण झाली. आपण सगळे मिळून एक राष्ट्र आहो हाच खरा राष्ट्राचा आधार, इतर सर्व गोष्टी प्रसंगी पूरक तशाच प्रसंगी मारक ठरू शकतात याचे भान तेव्हा आपणास झाले नाही.

आजही राष्ट्रवादाच्या त्याच भ्रामक तत्त्वज्ञानाच्या पगड्याखाली भारतीय व

पाकिस्तानी नेते मंडळी आहेत का? पाकिस्तानच्या नेत्यांनी व उच्च शिक्षित मंडळींनी याचे प्रत्यंतर आणून दिले आहेच: बांगला देशाची निर्मिती ही फाळणी घडवून आणणाऱ्या प्रक्रियेचीच पुनरावृत्ती आहे. आपण एक राष्ट्र आहोत ही भावना आहे तर राष्ट्र आहे, नाही तर राष्ट्र फुटण्यास कोणत्याही क्षणी सुरुवात होते, या सत्याचे भान त्यांना आलेच नाही.

आम्हा भारतीयांना तरी ते आले आहे का? तसे वाटत नाही. हिंदुत्ववादी विचारसरणीचे लोक राष्ट्राची व राष्ट्रीयत्वाची ज्या पद्धतीने व्याख्या व मांडणी करतात त्यात हे स्पष्ट दिसून येतेच. पण इतरांचे तरी काय? 'आपल्या सगळ्यांचे मिळून भारत हे राष्ट्र आहे' असे काही लोकांना अगदी मनोमन वाटले तरी तेवढ्याने ते एक राष्ट्र बनत नाही किंवा टिकून राहात नाही. स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस ही संघटना असेच म्हणत नव्हती का? अगदी आग्रहाने म्हणत होती. पण ते म्हणणे पुरे पडले नाही. हिंदू महासभेची मंडळी दंड सरसावून 'अखंड भारता'च्या घोषणा देत होती. पण ते दंड सरसावणेही पुरे पडले नाही. ब्रिटिश नसते तर फाळणी झाली नसती या म्हणण्यातही अर्थ नाही. कारण आम्ही काही झाले तरी जाणार असे त्यांनी म्हटल्यावर देखील फाळणी नाकारण्याचे आमच्याने- काँग्रेसच्याने, व हिंदू महासभेच्यानेही- झाले नाही. आपले सगळ्यांचे एक राष्ट्र आहे ही भावना सर्वांच्या ठिकाणी असली पाहिजे. तशी ती सर्वांच्या ठिकाणी सातत्याने व दृढपणे टिकून राहिली पाहिजे. एकदा केव्हा तरी राष्ट्र निर्माण केले (किंवा झाले) की पुढच्या काळात ही भावना असली काय वा नसली काय, पर्वा करण्याचे कारण नाही, अशी भूमिका घेता येत नाही. या भावनेची नित्य जोपासना करावी लागते.

इंग्लंडसारख्या काही शतके एकत्र काढलेल्या राष्ट्रातही त्या राष्ट्राच्या वेल्श व स्कॉटिश घटकांमध्ये आजही वेगळ्या राष्ट्रीय अस्मितेचा ज्वालामुखी उफाळून येतो. मग भारतासारख्या देशात तर या भावनेची जोपासना करण्याची दीर्घ काळ आवश्यकता राहील हे सांगायला नको.

भारत हे हिंदू राष्ट्र आहे असे म्हणणाऱ्यांची भूमिका कृत्रिम व खोटी आणि घातक आहे, हे येथवरच्या विवेचनातून लक्षात येईलच. अशा रीतीने, ख्रिश्चन, मुसलमान, ज्यू इत्यादींना वगळून, भारत हे एक केवळ सावरकरी हिंदूंचे राष्ट्र आहे अशी क्षणभर आपण कल्पना करू. अशा भारतातही सावरकरी हिंदू व्याख्येचा आधार टिकणारा नाही हे लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. बेळगावचा प्रश्न सोडविण्यात या 'हिंदू-पणा'चा काही उपयोग नाही. सगळे 'हिंदू' असूनही शिवसेनेची चळवळ उभी राहू शकतेच. सवर्ण 'हिंदू' आणि अस्पृश्य 'हिंदू' हा भेद 'हिंदू' या शब्दाच्या व्याख्येने पुसला जात नाही, त्यासाठी वेगळेच प्रयत्न करावे लागतात. बौद्ध हेही हिंदूच असे म्हटल्याने, नवबौद्धांना सवर्ण हिंदूंचा सांस्कृतिक वारसा हा आपला वाटत नाही ही वस्तुस्थिती बदलत नाही; आणि, पण या प्रकारच्या भेदातून पृथगात्म

राष्ट्रीय अस्मिता निर्माण होणार नाही असे कोणास म्हणावयाचे असेल तर त्याने द्रविड चळवळीची आठवण मनात बाळगण्यासारखी आहे. भाषिक पुनर्रचनेच्या वेळी भाषिक समाजांचे नेतृत्व करणाऱ्यांनी केलेली वक्तव्येदेखील आठवावीत. तात्पर्य, सावरकरी व्याख्येच्या हिंदू राष्ट्रातही, एक असल्याची भावना हाच राष्ट्र म्हणून एकात्मतेचा एकमेव आधार असेल हे लक्षात यायला हरकत नाही.

४

आपण सगळे एका राष्ट्राचे सभासद आहोत अशी भावना मूक स्वरूपात वा तीव्र जागृत स्वरूपात आढळते त्या लोकांचे, त्या अस्मितेने आकार दिलेले एक राष्ट्र अस्तित्वात येते, व ही भावना असेपर्यंत ते टिकते. राष्ट्र कशाला म्हणावयाचे, या प्रश्नाचे हेच एक उत्तर आहे. या अर्थाने भारत हे एक राष्ट्र आहे काय? आज ते एक राष्ट्र आहे असे म्हणता येईल. कारण स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडात जोपासलेल्या अस्मितेमुळे मूक स्वरूपात ही भावना सार्वत्रिक टिकून आहे. पण, त्याच वेळी, उद्याची शाश्वती देता येत नाही, असेही म्हणणे आवश्यक आहे. येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. भारत हे एक राष्ट्र न उरले तरी भारत ही राज्यसत्ता एकछत्री स्वरूपात टिकून राहू शकते. पण, राज्यसत्ता व राष्ट्र या दोन वेगळ्या गोष्टी आपण केल्या आहेत, आणि म्हणून आजच्या भारताच्या सरहद्दीमध्ये एक केंद्रीय सत्ता अस्तित्वात असणे हे राष्ट्र म्हणून कसोटीस उतरण्यास पुरेसे नाही; किंबहुना, या दोहोंचा तसा काही संबंध नाही. आज भारतीयांच्या ठिकाणची राष्ट्रीय अस्मिता १९४७ पेक्षाही अधिक क्षीण आहे.

१९६२, १९६५ व १९७१ अशा तिन्ही युद्धांच्या वेळी राष्ट्रीय अस्मितेचे विलोभनीय दर्शन घडले नाही का? तिन्ही वेळा युद्ध हे इतके थोडे दिवस चालले की, कसोटीचा प्रसंग आला नाही. म्हणून 'विलोभनीय दर्शन' हे शब्द गैरलागू वाटतात. आपण इतके म्हणू की, या तिन्ही प्रसंगी या भावनेला उजळा मिळाला व तिचा परिपोष थोडासा झाला. पण युद्धाच्या दोन-अडीच महिन्यांच्या एकंदर काळाबरोबर शांततेची सुमारे २५ वर्षेही हिशेबात घेतली पाहिजेत. या काळातल्या जमेच्या बाजू म्हणून ज्या सांगितल्या जातात त्यांमध्ये लोकांच्या भावनेशी संबंध फारसा येताना दिसत नाही. औद्योगिक विकास, अर्थव्यवस्थेचे सर्वव्यापी जाळे, सत्तेचे राष्ट्रव्यापी राजकारण, लोकशाहीच्या निवडणुकीसारख्या यंत्रणा, अशा काही गोष्टींनी हे राष्ट्र आज एकत्र बांधलेले आहे; पण, या राष्ट्रीय समाजव्यवस्थेत आपण कोठे बसतो?, यास आपले राष्ट्र का म्हणावयाचे?, हे प्रश्न ज्यांच्या मनात उपस्थित आहेत. असे गट पंचवीस वर्षांपूर्वी अजिबात नव्हते. आज ते निश्चितच अस्तित्वात आहेत किंवा येत आहेत.

पण हा वादग्रस्त मुद्दा आहे. कारण, शेवटी, भावनेचे मोजमाप निर्णायक पद्धतीने केले जाऊ शकत नाही; काही अंशी तरी हा निवाडा आत्मनिष्ठ राहतोच. मुद्दा असा की, राष्ट्रीय अस्मितेचा सतत परिपोष करीत राहणे जरूरीचे असते, व भारतात तर

त्याची अधिकच तीव्रतेने आवश्यकता आहे. त्याच वेळी राष्ट्रवादाच्या प्रचलित तत्त्वज्ञानाची कास धरून या भावनेचा परिपोष भारतात तरी होण्यासारखा नाही. कारण त्यातून भेदच जास्त उमटून पडतात, व 'आपण सर्व एकाच राष्ट्राचे' ही भावना धोक्यात येते, हेही आपण पाहिले.

५

राष्ट्र कोणाकोणाचे मिळून बनते याबाबत ज्या वेगवेगळ्या कसोट्या सांगितल्या गेल्या आहेत त्या सर्व कृत्रिम व खोट्या आहेत हे आपण पाहिले. भिन्न भाषा, धर्म, संस्कृती, वंश असलेल्या लोकांचे मिळून राष्ट्र बनू शकते असे आजच्या अस्तित्वात असलेल्या राष्ट्रांकडे पाहूनही आपणास दिसून येते. या बाबतीत घडामोडींचा क्रम काहीसा उलटा आहे. जगात आधी भिन्न भिन्न राष्ट्रिक लोकसमूह अस्तित्वात आले व अशा दर एक राष्ट्रिक लोकसमूहागणिक हळूहळू स्वतंत्र राष्ट्रीय राज्यसत्ता उदयास येत चालली आहे असा काही इतिहासक्रम आढळत नाही. तर राज्यसत्तांचे अनेक प्रकार झाले, व त्यात स्थित्यंतरे होत होत आज स्वतःस 'राष्ट्रे' म्हणविणाऱ्या राज्यसत्ता अस्तित्वात आल्या आहेत असे आढळते. आजची सर्व 'राष्ट्रे' ही कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या राज्यसत्तेची वारसदार म्हणून अस्तित्वात आली आहेत. त्यांतली काही 'राष्ट्रे' प्रथम राजसत्ता होत्या. उदाहरणार्थ, इंग्लंड, फ्रान्स, रशिया इत्यादी. काही वसाहती होत्या. उदाहरणार्थ, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इत्यादी. काही साम्राज्यवादी सत्तांच्या अंकित वसाहती होत्या. उदाहरणार्थ, भारत, सिलोन, ब्रह्मदेश, इत्यादी. याचाच अर्थ असा की, ऐतिहासिक घडामोडींचा परिणाम म्हणून निश्चित झालेल्या सरहद्दीच्या आत असलेल्या लोकांना घेऊन 'राष्ट्रे' जन्माला आली. आपण राष्ट्र असल्याची जागीव झाल्यानंतर, मग आपल्या अस्मितेला आधार म्हणून वेगवेगळ्या प्रकारे राष्ट्रवादाची मांडणी केली गेली. या मांडणीच्या आधारे मागाहून सरहद्दी बदलून घेण्याचे प्रयत्न गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांत कोठेकोठे झाले. पण या सर्व प्रयत्नांचे वैशिष्ट्य असे की, प्रत्येकाचा प्रयत्न सरहद्दींचा विस्तार करण्याचा होता; राष्ट्रवादी मांडणीशी सुसंगती राखून आपल्या 'राष्ट्रात' जे जे लोक व प्रदेश समाविष्ट होऊ शकत नाहीत त्यांना समंजसपणे वेगळे राष्ट्र करा म्हणून कोणी सांगितले नाही. हिटलरने ज्यू लोकांना जर्मन राष्ट्रात जागा नाही असे ठरविले, पण या भूमिकेशी सुसंगती राखून त्यांना एक वेगळे जर्मन भाषिक ज्यू राष्ट्र काढून दिले नाही. तात्पर्य असे की, विस्तारवादी धोरणांसाठी सोय म्हणून राष्ट्रवादाचा वापर केला गेला.

राष्ट्र ही संकल्पना निर्माण करणे आवश्यक का ठरले असावे त्यासंबंधी एक अंदाज असा करता येईल : कोणतीही राज्यसत्ता टिकून राहण्यासाठी त्या राज्यसत्तेचे सभासद असलेल्यांना बांधणारी एक निष्ठा असावी लागते. अशा निष्ठेची जरूरी का पडते? तर,

माणसांचे हितसंबंध, त्यांचे विचार, त्यांची साधने, स्वभाव अत्यंत भिन्न भिन्न असतात व त्यामुळे समाजात एक प्रकारचा अपरिहार्य असा विग्रह व त्या पोटी येणारा विस्कळित-पणा कायम असतो. असा विग्रह व विस्कळितपणा मर्यादेबाहेर गेल्यास समाज म्हणून टिकण्यासाठी आवश्यक ते एकसंधत्व न राहून माणसे वा गट सुटे पडतील. ही सर्व गुंतागुंत लक्षात घेऊन जागरूकपणे अशा निष्ठा प्राचीनकाळापासून राज्यकर्त्यांनी निर्माण केल्या असे म्हणता येणार नाही. पण अबोध पातळीवर याची गरज जाणवली असली पाहिजे. एकत्र कुटुंब, टोळी, मोठी जमात, वा राज्य असा कोणत्याही प्रकारचा स्थिर सामाजिक जीवन असलेला लहानमोठा समाज घेतला तरी दैनंदिन जीवनातील मतभेद व संघर्ष यांचा ताण सहन करू शकेल अशी एक निष्ठा जोपासली जात असल्याचे दिसते. ही निष्ठा वेगवेगळ्या साधनांनी व तंत्रांनी जोपासली गेल्याचे दिसते. राजसत्ते-खाली राजनिष्ठा होती. राजनिष्ठेकरवी लोकांना एकत्र बांधण्याचे सर्वांत टोकाचे उदाहरण म्हणून जपानचे उदाहरण देता येईल. पण फ्रेंच राज्यक्रांतीनंतर एका अर्थी राज-सत्तांचे युग अस्त पावले; राजे शिल्लक राहिले तरी राजनिष्ठा पुरेशी ठरेनाशी झाली. राजाला असलेले पारंपरिक प्रामाण्य संपुष्टात आले. पण तेच कार्य पार पाडण्यासाठी 'राष्ट्र' ही संकल्पना पुढे आली. असा एक अंदाज करता येतो.

तेव्हा, राष्ट्र ही संकल्पना आजच्या राष्ट्रीय-राज्यसत्तात्मक जगात एक कार्य पार पाडीत असल्याने तिची उपयुक्तता निर्विवाद आहे. पण त्याच वेळी, राष्ट्र कोणाकोणाचे मिळून बनते, या प्रश्नाला आपण म्हणू व ठरवू त्यांचे मिळून राष्ट्र बनते; राष्ट्राच्या स्वाभाविक सरहद्दी कोणत्या, या प्रश्नाला आपण त्या त्या वेळी स्वीकारू त्या, असे उत्तर येते हेही पक्के लक्षात ठेवले पाहिजे.

भारत हे केवळ हिंदूंचे राष्ट्र आहे असे आपण ठरवू शकतो; भारताच्या सरहद्दीं-मध्ये आपण हव्या त्या प्रदेशांचा समावेश करू शकतो. पण तसे करण्याला ऐतिहासिक वा तात्त्विक वा अनादी-अनंत सत्याचे असे कोणतेच प्रामाण्य नाही; त्या ठरविण्यातून केवळ तुमची आकांक्षा व्यक्त होते इतकेच. उलटपक्षी, भारत हे येथे असलेल्या सर्व धर्मीयांचे, वंशीयांचे, भाषिकांचे मिळून एक राष्ट्र आहे, आणि आज त्याच्या सरहद्दी १९४७ च्या १५ ऑगस्ट या दिवशी ठरल्या त्या सामान्यतः आहेत असे आपण ठरवू शकतो. त्यालाही ऐतिहासिक वा तात्त्विक वा अनादी-अनंत सत्याचे असे प्रामाण्य नाही. अशा प्रामाण्याची गरज आहे हे मानणेच मुळात भ्रामक आहे. हा शुद्ध व्यवहाराचा प्रश्न आहे; आणि पुढे जाऊन आपण म्हणू की, न्यायाचा व साध्या माणुसकीचा प्रश्न आहे. जर्मनी हे केवळ शुद्ध 'आर्य' रक्ताच्या लोकांचे राष्ट्र आहे हा हिटलरचा निर्णय न्याय्यही नव्हता, व्यवहार्यही नव्हता, आणि माणुसकीला सोडूनही होता. भारताबद्दलही, हिंदुत्ववादी भूमिकेमध्ये याच तिन्ही गोष्टींचा अभाव आहे. सावरकरांप्रमाणे, मुसलमान, ख्रिश्चन व ज्यू यांना मुळातच, व्याख्येने कायमचे

अराष्ट्रीय ठरविणे हे अन्याय्य, अव्यवहारी व माणुसकीला सोडून आहे.[1]

न्याय, व्यवहार व माणुसकी दोन्ही दृष्टींनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतात असलेल्या सर्वांचे भारत हे राष्ट्र आहे, असे मानणे इष्ट व योग्य ठरते. पिढ्यान् पिढ्या ज्या भूमीत ज्यांचे वास्तव्य आहे त्यांचा त्या भूमीवर सारखाच हक्क आहे, हे साधे न्यायाचे तत्त्व आहे. समाजातील पंचवीस एक टक्के लोकांना तुम्ही कधीच राष्ट्रीय होऊ शकत नाही असे म्हणणे म्हणजे, एक पंचमस्तंभीय म्हणूनच त्यांना रोल आहे असे आपणच सांगणे होय, व म्हणून त्यात अव्यवहार आहे. आणि बळाच्या जोरावर एखादी गोष्ट करता येते म्हणून ती करणे व अनेकांच्या जीवनात लाचारी, भय व असुरक्षितता निर्माण करणे हे शक्य असले तरी अमानुष वर्तन होय.

६

राष्ट्रनिष्ठा अंगी बाणविण्याचा मार्ग कोणता? या प्रश्नाचे उत्तर कोण कसे देतो त्यातून इतरही अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो.

प्रचलित राष्ट्रवादी तत्त्वज्ञान याचे एक उत्तर देत आले आहे. राष्ट्राभिमान जागृत करणे त्यासाठी आवश्यक आहे, आणि राष्ट्राभिमान "पूर्वपरंपरेची पूजा व शत्रूचा प्रखर द्वेष"[2] याद्वारा निर्माण केला पाहिजे असे हे उत्तर आहे. या उत्तराचा अनेक अंगांनी 'विकास' होत जातो. या दिशेने जे प्रयत्न केले जातात त्यांचे एक उद्दिष्ट भिन्न मतमतांतरे निपटून काढून एकसारखेपणा निर्माण करणे हे असते. एक पक्ष, एक नेता, एक संस्कृती अशा प्रकारे सर्व गोष्टींत एकेरीपणा आग्रहाने आणण्याचा येतो. या प्रयत्नांचे तपशील आपणास नाझी जर्मनीच्या इतिहासात मिळू शकतात. अशा प्रयत्नांची तर्कशुद्ध टोकाची मर्यादा व त्यांचे अपरिहार्य परिणाम दोन्ही तेथे आपणास आढळून येतात.

पण हे उत्तर खरोखरी समाधानकारक आहे का? कारण या मार्गाने जी निष्ठा

---

[1] "पण मुसलमान–ख्रिस्ती–ज्यू हे हिंदू का नाहीत?— तर यद्यपि त्यांपैकी कित्येक बाटलेल्यांची परंपरागत पितृभूमी ही भारतभूमीच असली तथापि त्यांचे धर्म अरबस्तान, पॅलेस्टाइनप्रभृती भारतबाह्य देशांत उपजल्यामुळे, ते, त्या भारतबाह्य देशांनाच आपली होली लॅन्ड– पुण्य-भू–मानणार. ही भूमी त्यांची पुण्य-भू नाही म्हणून ते हिंदू नाहीत." (वि. दा. सावरकर, 'हिंदुत्वाचे पंचप्राण', पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९४७, पृ. ११). जे सर्वस्वी नास्तिक आहेत, व जे भारतास "पुण्य-भू" (सावरकरांच्या अर्थाने) मानीत नाहीत, त्यांनाही वगळावे लागेल. असे आणखी अनेकांना : उदाहरणार्थ, समाजवादी, कम्युनिस्ट, इ.

[2] पु. ग. सहस्रबुद्धे, 'लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान', कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. ३.

उत्पन्न केली जाते ती वस्तुतः राष्ट्रनिष्ठा असते का? त्याही आधी, निष्ठा उत्पन्न केली जाते की लोकांवर ती लादली जाते, हा प्रश्न आहेच. तसेच आणि त्याहूनही महत्त्वाची हरकत अशी की, आत्मगौरवाची व शत्रुद्वेषाची एक नशा उत्पन्न करून भडकवलेल्या भावनेस राष्ट्रनिष्ठा म्हणता येईल का? या मार्गाने जी भावना निर्माण केली जाते ती राष्ट्रनिष्ठेच्या स्वरूपाची असते की वस्तुतः व्यक्तिनिष्ठा, गटनिष्ठा असते? कारण अशा मार्गाने राष्ट्रनिष्ठा अंगी बाणविण्याच्या आजवरच्या सर्व प्रयत्नांमध्ये राष्ट्रनिष्ठा आणि व्यक्ती-गट-पक्षनिष्ठा ही अविभाज्यपणे जोपासली जातात असे आढळून आले आहे. कोणत्या तरी एका व्यक्तीच्या वा गटाच्या वा पक्षाच्या हाती सत्ता एकवटण्यात अशी राष्ट्रनिष्ठा परिणत होते. याचाच सरळ अर्थ असा की, राष्ट्रनिष्ठा हा शब्द वापरून चक्क फसवणूक केली जात असते.

राष्ट्रनिष्ठेची अशी व्याख्या करणाऱ्या राष्ट्रवादी मंडळींचे खरे उद्दिष्ट नेहमीच आपल्या सर्वंकष नियंत्रणाखाली एक अति बलाढ्य शक्ती निर्माण करण्याचे असते ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे. म्हणूनच राष्ट्रवादी व साम्यवादी यांची विचारप्रणाली व दूरगामी उद्दिष्टे इतकी परस्परविरोधी असूनही, अति बलाढ्य शक्ती निर्माण करणे व तिच्यावर आपले सर्वंकष प्रभुत्व प्रस्थापित करणे ही नजिकची उद्दिष्टे एकच असल्याने, त्यांची वाटचाल एकाच मार्गावरून होत असल्यासारखी दिसते.

या प्रकारची राष्ट्रनिष्ठा अंगी बाणविण्याच्या प्रयत्नात स्वाभाविकपणेच मग व्यक्ति-स्वातंत्र्य, संघटना व विचारस्वातंत्र्य, समता, मानवी प्रतिष्ठा, सर्वांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग या मूल्यांचा बळी घेतला जातो. कारण तसे केल्याशिवाय राष्ट्रनिष्ठा अंगी बाणण्यासाठी योग्य ते वातावरण निर्माण होत नाही.

सर्वंकष एकाधिकारवादी राजवटीखाली बलाढ्य ताकद निर्माण करण्याचे समर्थन वेगवेगळ्या प्रकारे केले जाते. सामाजिक-आर्थिक परिवर्तनासाठी हा सर्वंकष एकाधिकार-वाद आवश्यक आहे असे साम्यवादी म्हणतात, तर शत्रूविरुद्ध अभेद्य फळी निर्माण करण्यासाठी, शत्रूवर मात करण्यासाठी त्याची आवश्यकता कडवे राष्ट्रवादी प्रतिपादतात. काही आफ्रिकी राष्ट्रांचे नेते, भिन्न-भिन्न व परंपरेने परस्परविरोधी असणाऱ्या टोळ्यांनी बनलेल्या देशात एक एकजूट निर्माण व्हावी, एक राष्ट्र आकारास यावे यासाठी त्याची आवश्यकता असल्याचे सांगतात.

देशात इतर कोणत्याच मार्गाने बलाढ्य शक्ती निर्माण करता येत नाही ही गोष्ट सिद्ध मानली तर वरील आशयाचे प्रतिपादन आपणास स्वीकारावे लागेल. पण अशी हुकूमशाहीस पोषक कृतक राष्ट्रनिष्ठा निर्माण न करताही समाजाची ताकद एक-वटता व संघटित करता येते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लंडमध्ये, आपले मूलभूत मतभेद कायम ठेवूनही, कॉन्झर्व्हेटिव्ह व मजूर पक्ष एकत्र आले व सर्व शक्तीनिशी नाझी जर्मनीशी त्या समाजाने लढा दिला. इस्राएलमध्ये अत्यंत अल्प वेळात साऱ्या राष्ट्राची ताकद एकवटता येते; आणि तरीही एकाधिकारवादी राजवटीची व त्या धर्तीच्या राष्ट्र-

निष्ठेची त्यांना गरज पडत नाही. ही दोन्ही राष्ट्रे सुशिक्षित, प्रगल्भ, व औद्योगिक-आर्थिक दृष्ट्या पुढारलेली असल्याने त्यांना ही गोष्ट शक्य आहे, पण भारतासारख्या अडाणी, अप्रगल्भ व मागस राष्ट्रात ती गोष्ट कशी शक्य आहे, असा युक्तिवाद केला जाईल; पण हा फसवा युक्तिवाद आहे. कारण, एक तर, देशातल्या सर्व जनतेस एकेरी 'राष्ट्रनिष्ठे'वर आणण्यासाठी जी साधने, तंत्रे, साधनसंपत्ती, बुद्धी, व परिश्रम खर्ची घालावे लागणार त्या सर्व गोष्टींचा वापर करून या उणीवा दूर करणे शक्य आहे. दुसरी गोष्ट, औद्योगिक-आर्थिक पुढारलेपणाचा मुद्दा असंबद्धही आहे. तिसरी गोष्ट, भारतीय जनता अडाणी वा अप्रगल्भ आहे असे म्हणता येणार नाही.

७

राष्ट्रनिष्ठेचा आशय ती अंगी बाणविण्याचा मार्ग यांबाबत पारंपरिक कडव्या राष्ट्रवादाने घेतलेली भूमिका व सांगितलेली उपाययोजना मूलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्ये धोक्यात आणणारी असल्याने त्यांचा अंगीकार करणे इष्ट नाही. पारंपरिक कडव्या राष्ट्रवादाच्या वेगवेगळ्या धारांनी मांडलेल्या राष्ट्रसंकल्पनाही कशा ऐतिहासिक अनुभव सोडून, व्यवहाराच्या दृष्टीने घातक, व प्रसंगी माणुसकीचा मुडदा पाडणाऱ्या आहेत तेही आपण पाहिले. म्हणजेच 'राष्ट्र' आणि 'राष्ट्रनिष्ठा' यांचा अगदी वेगळ्या प्रकारे विचार केला पाहिजे. 'भारत हे राष्ट्र समर्थ बनले पाहिजे, आणि त्यासाठी राष्ट्रनिष्ठेची जोपासना करणे आवश्यक आहे' असे म्हटले जात असताना समर्थ कशासाठी बनावयाचे व 'सामर्थ्य' याचा आपण अर्थ कसा करतो, सामर्थ्य आपण कशात मानतो, यांचाही विचार म्हणून अपरिहार्य ठरतो. प्रचलित राष्ट्रवादी तत्त्वज्ञानात सामर्थ्य म्हणजे राज्यसत्तेच्या हाती एकवटलेली सत्ता व लष्करी बळ असा शेवटी होतो, आणि नागरिकांचे कळसूत्री बाहुल्यात रूपांतर करूनच हे सामर्थ्य निर्माण केले जाते. तर इंग्लंड, इस्राएल यांसारखे जे अपवाद आपण वर नमूद केले त्या देशांमध्ये नागरिकांच्या सुबुद्धीवर आधारलेले सामर्थ्य संघटित केल्याचे आपण पाहतो व तोच मार्ग श्रेयस्कर मानला पाहिजे.

आणखीही एका मुद्द्याचा विचार करण्याची जरुरी आहे. राष्ट्रवादाचा उत्कर्ष एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी झाला. नेपोलियनच्या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेच्या विरोधात युरोपात राष्ट्रवादी विचारांच्या लाटा उसळल्या. एका महत्त्वाच्या अर्थाने राष्ट्रवादी चळवळी या त्यानंतरच्या ३०-४० वर्षांत पश्चिम युरोपात स्वातंत्र्यचळवळीही होत्या. म्हणजे राष्ट्रवादाने एक सर्जनशील कार्य पार पाडले. तीच गोष्ट साम्राज्यवादी सत्तांच्या विरोधात निर्माण झालेल्या राष्ट्रवादी चळवळींविषयी आपणास म्हणता येईल. पण या संबंध कालखंडात, साऱ्या जगाची विभागणी राष्ट्रांमध्ये झाल्यावर, राष्ट्र व बाहेरचे जग (इतर राष्ट्रे) यांचे संबंध कसे रहावेत याविषयी काही विशेष विचार झाला नाही. राजसत्तांच्या, साम्राज्यसत्तांच्या काळातले विस्तारवादी धोरणांचे राजकारणच त्यानंतरच्या

काळात चालू राहिले आहे. राष्ट्रवादी विचारसरणीनुसार जे ते राष्ट्र स्वतःस उज्ज्वल पूर्व-परंपरा व त्याहून उज्ज्वल भविष्य आहे असे मानते. सत्तास्पर्धेच्या आणि विस्तारवादी आन्तरराष्ट्रीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर उज्ज्वल भवितव्याचा अर्थ आपल्या राष्ट्राच्या क्षेत्रात भर टाकणे, आपल्या प्रभुत्वाचे क्षेत्र निर्माण करून जास्तीत जास्त राष्ट्रांना अंकित बनविणे, आणि आपल्या साम्राज्याचा विस्तार करणे असाच आजवर केला गेला आहे असे आढळते. म्हणजे, पारंपरिक राष्ट्रवादी विचारसरणीनुसार आन्तरराष्ट्रीय क्षेत्रात 'बळी तो कान पिळी' हाच कायदा राहणार एवढेच मानलेले नाही, तर ती गोष्ट स्वाभाविक मानली आहे; आणि राष्ट्राने या कायद्यानुसार बळी बनून इतरांचे कान पिळण्यात त्या राष्ट्राचे उज्ज्वल भवितव्य सामावलेले असते असे गृहीत धरलेले आहे. कारण पारंपरिक विचारसरणीनुसार सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे उद्दिष्ट राष्ट्रवादाने मानलेले नव्हते. पण पारंपरिक आन्तरराष्ट्रीय राजकीय व्यवहारांचे भीषण परिणाम आपण दोन महायुद्धांच्या रूपाने अनुभवलेले आहेत, आणि आजही छोटी-मोठी, निर्घृण संहारक युद्धे, शीतयुद्धाचे तणाव, व न परवडणारी शस्त्रास्त्रस्पर्धा या स्वरूपात आपणास त्याचे नित्य चटके बसत आहेत. हे असेच नित्य वाढत्या प्रमाणात चालत राहणार, तेच स्वाभाविक व योग्य आहे असे सुबुद्ध माणूस म्हणू शकणार नाही. म्हणून राष्ट्राचे इतर राष्ट्रांशी व्यवहार कसे रहावेत याचा विचारही आवश्यक ठरतो.

८

राज्यसत्तांतूनच आजची राष्ट्रे निर्माण झाली आहेत ही गोष्ट आपण आधी पाहिली आहे. याचा अर्थ काय होतो? मानवी इतिहासात जी स्थित्यंतरे होत असतात त्यांपैकीच राष्ट्रांची निर्मिती ही एक अवस्था आहे; व जग जसे बदलेल तशी ही रचना संपुष्टात येऊन दुसरीही रचना तिची जागा घेऊ शकेल. आज ही संकल्पना व त्या संकल्पनेवर आधारलेली रचना आपण राबविली पाहिजे. पण यावच्चंद्र दिवाकरौ टिकणारी राष्ट्रे ही एक रचना नाही, हेही लक्षात ठेवले पाहिजे.

राष्ट्राच्या सरहद्दी अभंग राखणे, 'राष्ट्र' टिकवून धरणे, यांना स्वयंभू असे महत्त्व नाही. आजवर आपण असे मानीत आलो आहोत. परक्या राष्ट्राचे सैन्य एखाद्या देशातील जनतेच्या मदतीस येणे ही गोष्ट नेहमीच अनिष्ट नाही ही गोष्ट बांगला देशाच्या उदाहरणामुळे स्पष्ट झाली आहे. एखादे राष्ट्र मोडणे हेही प्रसंगी स्वाभाविक व इष्ट असते हेही त्यावरून सिद्ध झाले आहे. तो तो संदर्भ जाणून घेतल्याखेरीज आपणास या बाबतीत काही निवाडा करता येत नाही. जे पाकिस्तानच्या बाबतीत घडले– व इष्टच असे घडले– ते भारताच्या बाबतीत मात्र कोणत्याही परिस्थितीत घडणारच नाही, घडताच कामा नये, व घडले तर ते अनिष्टच असणार, असे गृहीत धरून चालण्याचे कारण नाही. आज ज्या लोकांचे व ज्या प्रदेशांचे व ज्या सरहद्दी असलेले राष्ट्र अस्तित्वात आहे तसेच ते उद्या राहील असे नाही; राहिलेच पाहिजे असेही नाही.

हे एकदा आपण मान्य केले की, अट्टाहासाने काही गोष्टी कृत्रिमपणे टिकवून धरण्यावर भर देण्याचे कारण उरत नाही.

इतिहास नित्य नवी वळणे घेत असतो आणि त्यांपैकी राष्ट्रीय राज्यसत्ता हे एक वळण आहे ही गोष्ट एकदा आपण पक्की ध्यानात घेतली की आपली दृष्टीच (पर्स्पेक्टिव्ह) बदलते. पुढे येणाऱ्या ज्ञात व अज्ञात, अंदाज करता येण्यासारख्या व न करता येण्यासारख्या नव्या स्थित्यंतरांना संमुख राहून सुध्याची व्यवस्था आपण राबविण्याची दृष्टी आपणास प्राप्त होते. उदाहरणार्थ, १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीचा 'अखंड हिंदुस्थान' परत एकवार निर्माण करण्याचे आपण मग स्वप्न पहात नाही, आज आहे तीच पाकिस्तान, भारत, बांगला देश ही रचना कायम राहावी असाही हट्ट बाळगत नाही; आजवर पाकिस्तानने आमच्याशी वैर पत्करले म्हणून पुढेही तो देश आमचा वैरीच राहणार असे आम्ही प्रतिपादन करीत राहात नाही. परिस्थितीत होणारे नवे बदल, त्याच्या पाऊलखुणा ओळखण्याइतकी आमची दृष्टी भविष्यसंमुख सदैव राहते.

दरम्यानच्या काळात आजच्या व्यवस्थेत येऊन पडणारी जबाबदारी आपण उचलायला राजी असतो, पण त्या कृतीला कायम वर्तमानाचाच तेवढा संदर्भ असेल अशी दक्षता घेतो. उदाहरणार्थ, आज आमच्या देशात समाविष्ट असलेला प्रदेश बळजबरीने कोणी काढून घेऊ पाहील तर आम्ही त्याचा कसून प्रतिकार करू; पण तो प्रतिकार करीत असताना आमच्या आजच्या सरहद्दींना काही एक केवल पावित्र्य आहे अशी खोटी समजूत बाळगणार नाही, त्यापोटी तो प्रतिकार असणार नाही; तर, बळजबरीने एखादी गोष्ट आमच्यावर लादण्यास आमचा विरोध आहे म्हणून आम्ही प्रतिकार करू. या दृष्टिकोणातून पाहिल्यास, अडेलतट्टूपणा व कणखरपणा यांत फरक आहे हे स्पष्ट होईल. राष्ट्याराष्ट्रांमधील कोणतेही प्रश्न विवेकाच्या व परस्परसमजुतीच्या साह्याने सोडविण्यास व त्यासाठी देवाणघेवाण करण्यास आपली तयारी असेल, पण कोणतीही गोष्ट आम्ही लादून घेणार नाही.

९

पूर्वीच्या इतिहासावरून असेल, पण असे मानले गेले आहे की, या जगात टिकावयाचे असेल तर राष्ट्राने इतरांपेक्षा जास्त बलाढ्य असले पाहिजे. यामागचे गृहीतकृत्य असे की, प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे लचके तोडायला टपूनच बसलेले आहे. संशय, अविश्वास, भय एका बाजूला, आणि दुसऱ्या बाजूला विस्तारवादी महत्त्वाकांक्षा, प्रभुत्वाची आकांक्षा. अशाच मानसिक वातावरणात दीर्घ काळ वाढलेल्या मंडळींना बदललेल्या वास्तवाची दखल घेता आलेली नाही. राजसत्ता, साम्राज्यसत्ता व त्यांच्या वसाहती या अवस्थेतून स्वतःस राष्ट्र म्हणून ओळखणाऱ्या राज्यसत्तांच्या अवस्थेप्रत स्थित्यंतर घडून आले. त्या प्रक्रियेतून निर्माण झालेली रचना ही काही काळ–पाचपन्नास वर्षे अस्थिर राहणे, ती हळूहळू स्थिर होत जाणे स्वाभाविक मानले पाहिजे. सरहद्दी

व प्रदेश यावरून भारताचे चीन-पाकिस्तानशी असलेले तंटे, मध्यपूर्वेत अरब राष्ट्रांतील आपापसातील तणाव, तसेच अरब राष्ट्रे व इस्राएल यांच्यातले वैर, आफ्रिकेतील देशांमधील देशांतर्गत अस्थैर्य, या सर्वांचे स्वरूप अस्थैर्यातून स्थिरतेकडे जाणाऱ्या संक्रमणावस्थेतील समस्या या प्रकारचे आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील जी नवीन जमीन आहे ती पुरती स्थिर झालेली नसते म्हणून भूकंप, ज्वालामुखींचा स्फोट असे प्रकार जसे घडतात तसेच या बाबतीत आहे.

राष्ट्रीय अस्मिताच केवळ जगभर सर्व लोकांमध्ये जागी झालेली आहे असे नाही. कमीअधिक वेगाने शिक्षण, विज्ञान, उद्योगधंदे, शेती अशा विविध आघाड्यांवर लोकसमूह वाटचाल करीत आहेत. अशा या सर्वस्वी नवीन जगात जुन्या प्रकारच्या विस्तारवादाचेच नव्हे तर सत्तेची मक्तेदारी, प्रभुत्वाचे क्षेत्र या कल्पनांचेही दिवस भरत आले आहेत. राष्ट्रीय राज्यसत्तांची जी एकंदर रचना आकारास येत आहे ती अतिशय गुंतागुंतीची आहे, व त्यात राष्ट्रांच्या वर्तनांवर अनेक प्रकट व प्रच्छन्न, ढोबळ व सूक्ष्म अशी बंधने व नियंत्रणे निर्माण झालेली आहेत. रशिया व अमेरिका यांसारख्या सुपर-पॉवर्सनी हे जग नीट तोलून धरले आहे हा एक भ्रमच आहे. कारण या अजस्र सत्तांनाही लिलिपुटियन राज्यसत्तांनी बांधून टाकले आहे असे दिसून येईल. जगभर त्या त्या प्रदेशांतील लोकांच्या ठिकाणची जागती व त्यांचे संघटन यांमुळे जुन्या रीतीभाती बाद ठरत आहेत हे खरे त्यामागचे रहस्य आहे.

लोकवस्ती सघन असलेला प्रदेश जिंकून तो आपल्या राज्यसत्तेत रिचविणे– देशाचा भाग म्हणून, किंवा अंकित राष्ट्र म्हणून, किंवा वसाहत म्हणून– हे कालपरवापर्यंत शक्य होते, रीतीला धरून होते. आज ही गोष्ट शक्यतेच्या कोटीतली राहिलेली नाही, व रीतीलाही धरून नाही. हा एक आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवहारातला क्रांतिकारक बदल आहे.

हा बदल लक्षात घेऊन त्यातून काय निष्कर्ष निघतो ते पाहिले पाहिजे. एकमेकांविरुद्ध युद्धात परिणत होणारे विस्तारवादाचे राजकारण हे राज्यसत्तांचे मुख्य कार्यक्षेत्र होते त्या काळात राष्ट्राचे दुबळेपण वा सामर्थ्य या राजकारणाच्या संदर्भात जोखले जात होते. हे राजकारणच कालबाह्य ठरत चाललेल्या जगात लष्करी बळ व राज्यसत्तेच्या हाती एकवटलेल्या सत्तेचे परिमाण यांवरून राष्ट्रांचे दुबळेपण वा सामर्थ्य मोजणे गैरलागू व चुकीचे ठरेल.

प्रत्येक राष्ट्राने आपल्या विशिष्ट स्थानाच्या पार्श्वभूमीवर आपल्याकडे आलेल्या 'रोल'चे भान ठेवून त्या त्या वेळी आपले लष्करी बळ उभे केले पाहिजे. भारताच्या संदर्भात, पाकिस्तानच्या शत्रुत्वास पुरे पडेल एवढे लष्करी बळ काही काळ बाळगायला हवे. आणि तेही त्याचे क्रियाशील शत्रुत्व टिकून आहे तोवरच. भारतास, त्याने आपले लष्करी सामर्थ्य वाढविल्यास, आशियाचे नेतृत्व मिळेल, किंवा सुपर-पॉवरचा दर्जा मिळेल, हा एक केवळ भ्रम आहे. बांगला देशाचे राजकारण यशस्वीपणे केले व पाकिस्तानचा पराभव (!) केला म्हणून भारताला एक 'बडे राष्ट्र' म्हणून या भू-भागात मान्यता

मिळाली आहे हा भ्रमच होता व तो झपाट्याने ओसरला आहेच. औद्योगिक-आर्थिक-दृष्ट्या भारत 'समर्थ' बनेल तेव्हाही, केवळ त्या कारणाने भारतास कोणाचे नेतृत्व प्राप्त होणार नाही; या सामर्थ्याचा वापर करून तो काही राष्ट्रांना कदाचित आपल्या दडपणाखाली ठेवू शकेल, पण त्याला नेतृत्व म्हणत नाहीत. आणि, असे दडपण आणण्याचे दिवसही संपले आहेत. जपान भारताच्या तुलनेने अनेक पटींनी संपन्न व समर्थ आहे, पण जपानचे नेतृत्व जगातले एकही राष्ट्र आज मानीत असल्याचे दिसत नाही.

१०

राष्ट्र, राष्ट्रनिष्ठा, सामर्थ्य, दुबळेपण यांविषयींच्या पारंपरिक प्रचलित समजुतींचे भ्रमपटल दूर झाले म्हणजे मग खऱ्या प्रश्नांकडे आपले लक्ष वळते. आणि खरे प्रश्न देशान्तर्गतच आहेत. १९४७ च्या १५ ऑगस्टला स्वतंत्र झालेल्या भारतातील सर्व लोकांचे मिळून हे राष्ट्र बनलेले आहे. या राष्ट्रातील लोकांच्या कल्याणाचे प्रश्न हे खरे प्रश्न आहेत. त्या तारखेस मिळालेले स्वातंत्र्य हे औपचारिक व राजकीय स्वातंत्र्य होते. औपचारिक राजकीय स्वातंत्र्य एखाद्या लोकांस किती स्व-तंत्र बनवू शकते? त्या मर्यादेपलीकडे असलेले औपचारिक राजकीय स्वातंत्र्य करण्याचे प्रश्न हे खरे प्रश्न आहेत. १९४७ साली आमची एक वेगळी राष्ट्रीय राज्यसत्ता अस्तित्वात आली; पण आम्ही एक एकात्म समाज अद्यापि बनलेलो नव्हतो. त्याकरता सत्तेचे हस्तान्तर थांबणे गैर ठरले असते. पण सत्तेच्या हस्तान्तराने काही ती किमया साधलेली नाही. दीर्घ व सतत परिश्रमाने साधणारी व त्याच मार्गाने कायम टिकवून धरता येणारी ती गोष्ट आहे. असा समाज निर्माण करण्याचे प्रश्न खरे प्रश्न आहेत.

निरभ्र, नितळ मनाने विचार केला तर असे लक्षात येईल की, आमच्या राष्ट्रीय आकांक्षेचे तारू तरणार की फुटणार ही गोष्ट या खऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीशी निगडित आहे. कारण भारतातल्या विविध भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक समूहांना हा माझा देश आहे असे जर वाटले नाही तर आज एक राष्ट्र असलेल्या भारतात अनेक राष्ट्रीय अस्मिता निर्माण होणे ही सहजशक्य गोष्ट आहे.

म्हणजे, आंतरराष्ट्रीय व्यवहारांच्या बाबतीत ज्याप्रमाणे भविष्यसंमुखता आवश्यक आहे, त्याप्रमाणे देशान्तर्गत प्रश्नांच्या सोडवणुकीच्या बाबतीत लोकाभिमुखता आवश्यक आहे. ही लोकाभिमुखता थोडी स्पष्ट केली पाहिजे. पारंपरिक कडवे राष्ट्रवादी 'भारत राष्ट्रा'चे वर्णन करतात ते राष्ट्र ही एक अमूर्त, केवल अशी प्रतिमा असते; त्या प्रतिमेतले 'राष्ट्र' कधी अस्तित्वात होते असे आढळत नाही, आणि ते कधी अस्तित्वात यावयाची शक्यताही नसते. कारण ती प्रतिमा केवळ अमूर्त व केवल नसते, तर बनावट व खोटी असते. सावरकरांच्या 'हिंदू' व 'हिंदुत्व' या शब्दांच्या पाखण्याच मुळात कशा कृत्रिम व खोट्या आहेत हे आपण पाहिलेच. असे होते कारण

वर्तमानकाळात सभोवती राहात असलेल्या हाडामांसाच्या माणसांना, त्यांच्या गुणदोषांसकट आपले मानून त्यांना समाविष्ट करून घेणारा समाज त्यांच्या डोळ्यांपुढे नसतो. लोक जसे आहेत तसे ते, या मंडळींच्या लेखी, राष्ट्राचे नागरिक होऊ शकत नाहीत. हिटलरच्या जर्मनीत जर्मन राष्ट्राचे नागरिक होण्यासाठी 'शुद्ध आर्य रक्ताचे' असणे आवश्यक होते. 'शुद्ध आर्य रक्त' हीच मुळी एक बनावट कपोलकल्पना होती. सावरकरांच्या हिंदुत्वाच्या व्याख्येत "धर्मांच्या नि संस्कृतीच्या बंधनांनी अनुप्राथित झालेले" असे शब्द आहेत. सावरकरांच्या व्याख्येनुसार आजच्या भारतात "हिंदू" कोण ते ठरविणे सोपे आहे. (साम्यवादी समाजवादी, व नास्तिकांचा प्रश्न सोडून). त्या कसोटीवर पंचवीस-एक टक्के लोक वगळले जातात. पण ज्यांचा त्यांच्या व्याख्येनुसार "हिंदू"मध्ये समावेश होतो त्या हिंदूंबाबतही ते धर्माच्या नि संस्कृतींच्या बंधनांनी अनुप्राणित झालेले असतीलच असे गृहीत धरता येत नाही. म्हणजे, त्यांच्यात परत खरे हिंदू व कमअस्सल हिंदू कोण ते ठरविणे आले. शिवाय बंधनांनी म्हणजे कोणत्या बंधनांनी, कारण धर्माची व संस्कृतीची काही बंधने झुगारण्याचा पुरस्कार खुद्द सावरकरांनीच आग्रहाने चालवला नव्हता का? म्हणजे एक तर निवड करणे आले, किंवा अमूक अमूक गोष्टी या 'खऱ्या हिंदू धर्म व संस्कृती'त नव्हत्याच असे म्हणणे आले. पुढची अडचण अशी की, बौद्ध, जैन, शीख वगैरे भारतात निपजलेल्या सर्व धर्मीयांना ते हिंदूपण बहाल करतात, पण या धर्मांच्या शिकवणी व परंपरा परस्परविरोधी आहेत, त्याचे काय? म्हणजे मग एक अधिकृत अशी परंपरा मांडावी लागते; व तिचा सर्वांनी स्वीकार केलाच पाहिजे, तसा स्वीकार करणाऱ्यासच 'हिंदू' मानले जाईल असे जाहीर करावे लागते. अशा रीतीने, इतिहास किंवा प्रत्यक्ष वर्तमान वास्तव याच्याशी फारकत करून एक 'हिंदू'पण कल्पून त्या मानदंडाने नागरिकत्वाचे अधिकार कोणास मिळावयाचे ते ठरविले जाते. म्हणजे हा राष्ट्रवाद संकल्पनाभिमुख आहे, लोकाभिमुख नाही. लोकाभिमुखता म्हणजे आज भारतात राहणाऱ्या सर्व लोकांना मोकळेपणी देशाचे नागरिक म्हणून स्वीकारण्याची वृत्ती व तयारी.

११

राष्ट्राला निष्ठा म्हणजे लोकांशी निष्ठा; तुमच्या काळात राहणाऱ्या लोकांशी निष्ठा. लोकांशी निष्ठा म्हणजे त्यांच्या कल्याणाशी निष्ठा, त्यांच्या सुखदुःखांशी समरसता.

पण हे संदिग्ध आहे. जगातल्या अनेक हुकूमशहांनी लोककल्याणाचे कारण पुढे करूनच सर्वंकष हुकूमशाही राजवटी उभारल्या. तेव्हा नुसते लोकांच्या कल्याणाशी निष्ठा एवढे म्हणून भागणार नाही. लोकांचे कल्याण सर्वांनी खिश्चन होण्यात आहे असे एखाद्यास वाटेल, एखाद्यास सर्व जग हिंदू बनविण्यात आपण जगाचे कल्याण साधत आहोत असे वाटेल;– लोकांचे कल्याण कशात आहे याबद्दल अनेक मते आज प्रचलित आहेत व नेहमीच राहणार. हे मतभेद पूर्णपणे प्रामाणिकही असतात. तेव्हा आपापल्या

निष्ठेप्रमाणे काम करण्याचा अवसर प्रत्येकास असला पाहिजे, ही गोष्ट ओघाने आली. काम करावयाचे म्हणजे आपल्यासारखेच अनेकांचे मत बनवावयाचे. अशा मतपरिवर्तनाचे वैध मार्ग ही लक्ष्मणरेषा मानली तरच लोककल्याणाशी निष्ठा सांगत सर्वंकष हुकूमशाही निर्माण होण्याचा मार्ग बंद होतो. मतपरिवर्तनाचे प्रयत्न करण्याच्या इतरांच्या हक्कांवर अतिक्रमण होता कामा नये; तसेच काही गटांच्या हातात या क्षेत्रातली विविध साधने एकवटता कामा नयेत. ज्यामुळे असे घडून येईल ते मार्ग व ती व्यवस्था अवैध होय. तसेच, उद्या काही गोष्टी घडाव्यात असे वाटत असल्यास आज त्यासाठी त्याग करणे आवश्यक असते, काही बंधने स्वीकारणे आवश्यक असते. पण हे स्वेच्छया व्हावयास हवे. या प्रकारच्या धोरणांसाठी लोकांची संमती संमोहनस्वरूपी प्रभावापोटी वा भावना उद्दीपित करून एका नशेच्या अवस्थेत एका क्षणी मिळविता येते, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन अशी संमती नियमाने ठराविक अशा कालावधीनंतर पुनःपुन्हा घेण्याचे बंधन घालणे आवश्यक आहे.

या प्रकारे वैध मर्यादांच्या आत राहून आपल्या समजुतीप्रमाणे व श्रद्धेनुसार लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असणे म्हणजे राष्ट्रनिष्ठ वर्तन होय, व आपले व्यावसायिक जीवन या धोरणाने जगण्याचा विचार रुजविणे म्हणजे राष्ट्रनिष्ठा अंगी बाणविणे होय.

या कसोट्यांवर ताडून पाहिले तर, भारत या राष्ट्राचे नागरिक असणाऱ्या कित्येकांचे वर्तन लोकांच्या कल्याणाचा घात करणारे आहे असे आपणास आढळेल. पारंपरिक राष्ट्रवादाच्या व्याख्येनुसार राष्ट्रनिष्ठेच्या कसोटीवर उतरणारी मंडळी व्यवहारात देशबुडवेगिरी करू शकतात, हा धडा लक्षात घेण्यासारखा आहे. कारण पारंपरिक राष्ट्रनिष्ठेचा गाभा राज्यसत्तेचे "हात बळकट करणे" हा आहे. आपल्या राष्ट्राच्या गौरवाचे पोवाडे गाणे हा त्याचा वाचिक अविष्कार आहे. आणि या दोन्ही गोष्टी उत्साहाने करणारी व्यक्ती लोककल्याणाशी द्रोह करणारे वर्तन, स्वतःच्या राष्ट्रनिष्ठेशी अप्रामाणिक न राहताही करू शकते. भारतात आपणास याचे प्रत्यंतर हरघडी येत आहे. युद्धाच्या प्रसंगी रस्त्यांतून निधी गोळा करीत हिंडणारे राष्ट्रनिष्ठ नटनटी दुसरीकडे काळा पैसा करतात, कर चुकवितात, ऐश्वर्यात राहण्यात दंग असतात. देवासमोर तासनतास नाक धरून बसणारा धर्मनिष्ठ सावकार कुळांना अमानुष वागणूक देतो, हे चित्र आपणास परिचित आहे, तसेच हेही चित्र आहे. कारण एकाची धर्मनिष्ठा व दुसऱ्याची राष्ट्रनिष्ठा हाडामांसाच्या लोकांपासून वेगळी, अमूर्त अशी असते.

भारताचे दुबळेपण खरे आहे ते इथे. लोककल्याण, सार्वजनिक व्यवहाराचे नीतिनियम, यांसारख्या गोष्टी आम्हास ठाऊक नाहीत. हा केवळ पारतंत्र्याचा परिणाम नाही. दीर्घकालीन स्वकीय व परकीय राजांच्या व साम्राज्यसत्तांच्या राजवटींच्या संस्कारांनी आम्ही सार्वजनिक जीवनात अतिशय परावलंबी– राज्यसत्तावलंबी– झालो आहोत हे खरे. पण आमच्या समाजाची रचनाही व तिच्यामागची तात्त्विक भूमिका समाजातील साऱ्यांचा समानभावाने व एकत्र विचार करण्याचा संस्कार देण्यास प्रतिकूल, नव्हे ठाम

विरोधी आहे, याचा तो मूलतः परिणाम आहे.

हे दुबळेपण घालवायचे तर 'समाज' या घटनेसंबंधीची मनोधारणाच बदलली पाहिजे. ती न बदलता लोकांचे व्यवहार कायद्यांनी व दंडाच्या भयाने बदलण्याचे प्रयत्न व्यर्थ जात असल्याचे आपण रोज अनुभवीत आहोत.

१२

भारताच्या आजच्या संदर्भासच स्वतःस बांधून घेऊन विचार केला तरी पारंपरिक राष्ट्रवाद कसा घातक आहे असे आपण पाहिले. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. पारंपरिक राष्ट्रवादाने ज्या ज्या राष्ट्रात त्याचे तर्कशुद्ध परिणत टोक गाठले त्या त्या राष्ट्रात तो घातकच ठरला आहे. पारंपरिक राष्ट्रवादी चळवळ ही स्वातंत्र्यलढ्याची चळवळ होती तोवरच व त्या मर्यादेतच तिने विधायक कार्य बजावले, आणि याचे कारण पारंपरिक राष्ट्रवादी तत्त्वज्ञानात तो गुण होता असे वस्तुतः नसून स्वातंत्र्याचे ध्येयच प्रखर विधायक होते. म्हणून पारंपारिक राष्ट्रवादी तत्त्वज्ञानाच्या घातुकतेवर ते मात करू शकले. स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळींनी पारंपरिक राष्ट्रवादाचा आधार घेतला हा एक ऐतिहासिक योगायोग होता. स्वातंत्र्यलढ्यास पारंपरिक राष्ट्रवादी तत्त्वज्ञानच आधार म्हणून हवे असते असे नाही.

राष्ट्रनिष्ठा ही भविष्यसंमुख व लोकाभिमुख असली तर तिचा आशय पारंपरिक राष्ट्रवादी भूमिकेपासून वेगळा होतो. अशी राष्ट्रनिष्ठा ही टोळीनिष्ठा, जमातनिष्ठा, प्रदेशनिष्ठा यांसारख्या स्थानिक व सीमित निष्ठेपासून 'वसुधैव कुटुंबकम्' या विशाल व विश्वव्यापी निष्ठेपर्यंतच्या वाटचालीतला एक टप्पा, एक अवस्था ठरते. अशा रीतीने आजच्या जगाची गरज आणि भारताची गरज यांमध्ये विसंवाद नाही हे स्पष्ट होते; आणि ही गोष्टही स्वाभाविक अशीच आहे. कारण जगाच्या पाठीवरील कोणत्याही प्रदेशातील, कोणत्याही धर्माच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या, जमातीच्या लोकांचे, सर्वसामान्य जनतेचे कल्याण हे त्याच काही सारख्या गोष्टींमध्ये असणार. दुसऱ्याचे ओरबाडून घेण्याची आकांक्षा बाळगली तरच एक निष्ठा दुसऱ्या बृहत्तर पातळीवरील निष्ठेशी विसंगत ठरते, विरोधी ठरते. आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारात दुसऱ्याचे ओरबाडून घेणे ही गोष्ट तुम्ही जर चांगली मानलीत तर देशान्तर्गत त्या वृत्तीचा प्रसार तुम्ही थांबवू शकत नाही. कारण राष्ट्रा-राष्ट्रांतील सरहद्दींप्रमाणे मनाचे, श्रद्धांचे, मूल्यांचे कप्पे वेगळे करता येत नाहीत, व कप्पेबंद व्यवहार करता येत नाहीत.

ज्यांच्या निष्ठा आर्थिक व सामाजिक समता व न्यायाधिष्ठित आहेत त्यांनी पारंपरिक राष्ट्रवादी तत्त्वज्ञान व व्यवहार यांचा विचारपूर्वक व बुद्धिपुरस्सर त्याग केला पाहिजे. भारताच्या येत्या पाचपंचवीस वर्षांच्या भविष्याचा विचार करता ही एक सर्वप्रथम, अतिशय महत्त्वाची व अत्यंत निकडीची गरज आहे.

□ □

भारतीय प्रबोधनाची वाटचाल

क्षितिमोहन मुखर्जी

१

'रेनेसान्स' म्हणजे काय? युरोपच्या इतिहासातील एका कालखंडास उद्देशून ही संज्ञा वापरली जाते. त्या विशिष्ट संदर्भात तिचा अर्थ बराचसा सुनिश्चित आहे. पण 'रेनेसान्स' या शब्दाच्या वापरातून एक सर्वांगीण प्रबोधनही सूचित करण्याचा रिवाज पडलेला आहे, आणि 'रेनेसान्स'च्या घटनेने युरोपात एक नवे, आधुनिक युग सुरू झाले असे त्या आधारे प्रतिपादन केले जाते. मुळातच इतिहास हे काही भौतिक विज्ञानासारखे शास्त्र नाही व त्यामुळे कोणत्याच संज्ञांना केवळ एकच व रेखीव असा अर्थ असत नाही. सर्वच संज्ञांच्या बाबतीत, कडांना अर्थांची सरमिसळ आणि संदिग्धता

अनुवाद : वसंत पळशीकर

टीप : अनुवाद काहीसा स्वैर आहे; तंतोतंत मुळाबरहुकूम नाही.